# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १६९/१०, १७२-१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) निवृत्ती आबा साळुंखे, ( तक्रार क्र १६९/१०)<br>मु.पो. वायफळे, ता. जत, सांगली<br>२) श्री. पांडुरंग कृष्णा यादव,( तक्रार क्र. १७२/१०),<br>मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**कोरम** :-१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. निवृत्ती आबा साळुंखे, मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली यांची तक्रार क्र. १६९/१० दि. ४.८.२०१० ने नोंद करण्यात आली आहे. तसेच श्री. पांडुरंग कृष्णा यादव, मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली यांची तक्रार क्र. १७२/१० दि. ४.८.२०१० ने नोंद केली आहे. सदरचे दोन्ही ग्राहक एकाच गावाचे आहेत, तसेच वि.प.चे कार्यालयही कवठे महांकाळ व संख हे आहे. तसेच विषय मागणी एकाच प्रकारची असल्याने वरील दोन्ही तक्रारीतील निर्णय एकत्रित दिला आहे.

उभयतांनी आपल्या मागणीप्रमाणे शेतीपंपासाठी जोडणी मिळावी म्हणून अर्ज केले. त्याप्रमाणे वि.प.ने दिलेली खर्चाची चलने भरलेली आहेत. तसेच चाचणी अहवालही दिले आहेत, परंतु वि.प.ने जोडणी दिली नाही. त्यामुळे भरपाई मिळावी व जोडणी मिळावी म्हणून मंचात तक्रार दाखल केली आहे. मंचाने वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला. दि. १७.९.२०१० रोजी सांगली मंडल कार्यालय विश्रामबाग येथे सुनावणीची तारखी निश्चित करुन त्याप्रमाणे सुनावणी संपन्न झाली. सुनावणीस ग्राहक व प्रतिनिधी गैंरहजर. तसेच नोडल ऑफीसर अथवा जबाबदार संबंधित हजर नाही. श्री. आर.आर. टिळक व श्री. मैंलापुरे उपस्थित.

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे कामकाज चालू होवून ५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी होवूनही वि.प.चा तक्रारीकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक नाही. अपुऱ्या कागदपत्रांच्या आधारे वि.प. मंचासमोर नाईलाजाने येत आहे. तसेच ग्राहक प्रतिनिधींनीही आवश्यक कागद तक्रारीसोबत जोडणे आवश्यक आहे. इतका कालावधी उलटूनही सकारात्मक बदल नाही. दोघांनीही सर्व तयारीने मंचासमोर तक्रार दाखल झाल्यावर सामोरे जाणे योग्य आहे याचा उभयतांनी पुढील काळात विचार करावा.

प्रस्तुत प्रकरणी दि. २७.४.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला असल्याचे प्रतिनिधींनी नमूद केले आहे. त्याप्रमाणे वि.प.ने फर्म कोटेशन व संयुक्त तपासणी दि. ४.५.२०१० रोजी केल्याचा अहवाल मंचाने विचारणा केल्यावर दि. ३०.९.२०१० रोजी हजर केला आहे. तथापि ग्राहकाने त्यानंतर म्हणजे संयुक्त तपासणी झालेनंतर दि. ३१.७.२०१० रोजी परत नव्याने अहवाल दिल्याचे नमूद केले आहे. त्याबद्दल वि.प.कडून कोणताही आक्षेप वा तक्रार नोंदविलेली नाही. त्यामुळे दि. ३१.७.२०१० नंतर तीन महिन्याच्या आंत म्हणजे दि. ३१.१०.२०१० पूर्वी वीज जोडणी द्यावी. सबब कृती मानकाप्रमाणे विलंबासाठी भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) दि. ३१.१०.२०१० पूर्वी वरील तक्रार क्र. १६९/१० व १७२/१० या ग्राहकांना मागणीप्रमाणे वीज जोडणी द्यावी.

२) भरपाईचा आदेश नाही.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )

सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )

अध्यक्ष